# निवासी वसतिगृह प्रवेश ऑनलाईन परीक्षा

## ऑनलाईन परीक्षा विद्यार्थ्यांसाठी सूचना-

1. परीक्षेच्या वेळेपूर्वी ०१ तास अगोदर परीक्षा केंद्राला रिपोर्टींग करणे जरुरी आहे.
2. परीक्षेला येताना तुम्हाला दिलेले प्रवेशपत्र जवळ असावे.
3. विद्यार्थ्याने स्वतः जवळ इतर कोणतेही ओळखपत्र बाळगावे.
4. सदर परीक्षा हि १०० प्रश्नाची असेल.
5. परीक्षे साठी वेळ १ तास ४० मिनिटे (१०० मिनिटे) असेल.
6. विद्यार्थ्याने परीक्षा सुरु असताना मोबाईल, कॅलक्यूलेटर, पेजर, सारखे कोणतेही साधन जवळ बाळगू नये.
7. मुख्य ऑनलाईन परीक्षा सुरु करण्या पूर्वी तुम्हाला ५ प्रश्नाचा डेमो दिला जाईल.

## **ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप खालील प्रकारचे असेल -**

१. समोर आलेल्या स्क्रीन मध्ये तुम्हाला तुमचे नाव टाईप करावे लागेल.




२. नाव टाईप केल्या नंतर **Start Quiz** या बटण वर क्लिक करा.

३. **Start Quiz** या बटण वर क्लीक केल्या नंतर तुमचा वेळ सुरु होईल.



४. परीक्षा सुरू झाले नंतर खालील प्रमाणे स्क्रीन दिसेल .




५. सर्वात वर प्रश्न असून त्या खाली ४ पर्याय दिसतील.



६. योग्य त्या पर्याय वर क्लिक केल्या नंतरच **Accept** हे बटन अक्टीव्ह होईल, त्या बटण वर क्लिक करा.




७. त्यानंतर आपोआप पुढचा प्रश्न समोर येईल.

८. जर एखादा प्रश्न येत नसेल तर **Skip** या बटण वर क्लिक करून तुम्ही तो प्रश्न नंतर सोडवू शकता .

९. एकदा **Accept** केलेला( सोडविलेला प्रश्न ) प्रश्न तुम्हाला परत सोडविता येणार नाही.

१०. तुम्ही किती प्रश्न सोडविले, किती प्रश्न शिल्लक राहिले, आणि किती प्रश्न सोडून दिले (Skip केले ) याचा तपशील स्क्रीन च्या तळाशी डाव्या बाजूला दिसेल.

११. परीक्षेचा वेळ किती शिल्लक राहिला आहे. ते तुम्हाला स्क्रीन च्या तळाशी उजव्या बाजूला दिसेल.

१२. वेळ संपला कि परीक्षा आपोआप बंद होऊन तुम्हाला तुमचा निकाल स्क्रीन वर दिसेल .




जर यासंदर्भात काही अडचण असल्यास आमच्याशी संपर्क साधावा.

---

**कार्यकारी संचालक,**

**कर्मवीर विद्या प्रबोधिनी,**

**सातारा**

**संपर्क -०२१६२-२३१०७४,**